## जलक्रांतीचे जनक महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांच्या गौरवपूर्ण कार्याच्या स्मरणार्थ 'जलभूषण पुरस्कार'

### मार्गदर्शक सूचना

1. “ स्वर्गीय शंकरराव चव्हाण ” जलभूषण पुरस्कार बाबतचा दिनांक 13 मे 2022 शासन निर्णय आणि अर्ज काळजीपूर्वक वाचावा मगच अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

2. अर्जात माहिती भरताना ती माहिती प्रत्यक्ष केलेल्या कामावर आधारित, वस्तुनिष्ठ आणि सत्य असावी.

3. पुरस्कारांच्या वर्गवारीनुसार असलेल्या प्रश्नावलीमध्ये आपण आपल्या कामांची माहिती भरावी

4. प्रश्नावलीमधील प्रत्येक मुद्द्यासाठी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या शब्दांच्या मर्यादित माहिती देता येईल.

5. प्रश्नावलीमध्ये दिलेल्या प्रश्नांबाबत व माहितीबाबत पूरक वृत्तपत्र कात्रणे फोटो इतर माहिती अपलोड करता येईल.

6. दोन किंवा जास्त फोटो किंवा फाईल असल्यास झिप फाईल करून अपलोड करावी. (फाईल झिप कशी करावी हे इंटरनेटवर शोधावे.)

7. एकच फोटो किंवा फाईल अपलोड करावयाची असल्यास आहे त्या स्वरुपात अपलोड करता येईल.

8. झिप फाईल अपलोड करावयाची मर्यादा 100 एमबी असेल.

9. आपल्या कामाचा व्हिडीओ असल्यास तो देखील अपलोड करता येईल.

10. व्हिडीओ अपलोड करावयाची मर्यादा 100 एमबी असेल.